महत्वाचे /-

क्र.2017/पुवि/प्रशा8ब/टे-15/सिआर
जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड
दिनांक 04 आक्टोंबर,2017

प्रति,

मा.महासंचालक,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
जाहीरात विभाग, नवीन मंत्रालय, 17 वा मजला,
रुम नंबर 10, जी.टी.हॉस्पीटल आवार मुंबई 400 032

विषय :- लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत धान्य उपलब्धतेच्या हमीकरीता निश्चित केलेल्या सुधारीत धान्य वितरण पध्दतीनूसार अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तुंचे वाहतुक कंत्राट निश्चित करणेबाबतची खुली निविदा प्रसिध्द करण्याबाबत.

संदर्भ :- अन्न व नागरी पुरवठा विभागाचे शासन निर्णय क्रमांक कंत्राट 1016/प्र.क्र.169/नःप्रः3अ दिनांक 20 एप्रील,2017

महोदय,

उपरोक्त विषयी सविनय सादर करण्यात येते की, लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत धान्य उपलब्धतेच्या हमीकरीता निश्चित केलेल्या सुधारीत धान्य वितरण पध्दतीनूसार अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तुंचे वाहतुक कंत्राट निश्चित निविदा प्रसिध्द करण्याबाबत संदर्भीय शासन निर्णयाद्वारे सूचित करण्यात आले असून प्रकरणात नांदेड जिल्हयातील अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तुंचे वाहतुक कंत्राट निश्चित करण्याबाबत यासोबत जोडलेली संक्षिप्त निविदा सूचना खालीलप्रमाणे तीन वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| 1. | कार्यालयाचे नाव | जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड |
| 2. | दूरध्वनी क्रमांक | 02462- 232521 |
| 3. | जाहीरात प्रकाशित करावयाचा दिनांक | 09 आक्टोंबर, 2017 |
| 4. | वृत्तपत्रे | राष्ट्रीय सर्वाधिक खपाच्या एका व राज्यातील सर्वाधिक खपाच्या दोन वृत्तपत्रात एक वेळा (कमीत कमी जागेत) |
| 5. | जाहीरात देयक सादर करणे | जिल्हा पुरवठा कार्यालय, नांदेड |

सहपत्र- जाहीरात मसुदा 4 प्रतीत.

3/10/2017

जिल्हाधिकारी नांदेड

महाराष्ट्र शासन

जिल्हाधिकारी कार्यालय, पुरवठा विभाग नांदेड

## लक्ष्यनिर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत धान्य उपलब्धतेच्या हमीकरीता निश्चित केलेल्या सुधारित धान्य पध्दतीनूसार अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तुंचे वाहतुक कंत्राट निश्चित करणेबाबतची संक्षिप्त ई-निविदा सुचना

क्रमांक 2017/पुवि/प्रशा 8ब/टे-15/सिआर-43 दिनांक 05 आक्टोंबर,2017

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानूसार जिल्हाधिकारी नांदेड यांचेकडून नांदेड जिल्हयासाठी महाराष्ट्र शासन अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक कंत्राट 1016/प्र.क्र.169/नापु16अ दिनांक 20 एप्रील,2017 नुसार सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत धान्य उपलब्धतेच्या हमीकरीता निश्तिच केलेल्या सुधारीत वितरण पध्दतीनूसार नांदेड जिल्हयामधील भारतीय अन्न महामंडळाचे बेस डेपोपासून ते शासकीय धान्य गोदामापर्यंतची अन्नधान्य, साखर (निर्धारित गोदामापासून) ईत्यादी जीवनावश्यक वस्तुंची पहिल्या टप्याची वाहतुक व शासकीय गोदामापासून ते रास्तभाव दुकानापर्यंत अन्नधान्य, साखर इत्यादी जीवनावश्यक वस्तु पोहोचविण्याकरीता दुस-या टप्याची वाहतुक करावयाची असून त्याबाबतचे आधारभूत दर पहिल्या टप्याच्या वाहतुकीकरीता 48.00 रुपये (प्रति क्विंटल संपुर्ण अंतराकरीता) व दुसरा टप्पा वाहतुक 40.00 रुपये (प्रति क्विंटल संपुर्ण अंतराकरीता) एकत्रित आधारभूत दर रुपये 88.00 (प्रति क्विंटल संपूर्ण अंतराकरीता) असल्याने निविदाकाराने एकत्रित आधारभूत दर विचारात घ्यावा. हया दृष्टीने दोन्ही टप्याकरीता 3 वर्षाच्या कालावधीसाठी निश्चित करण्यासाठी एकत्रित ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

निविदेबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे वर्णन | वाहतुक कामाचा कालावधी | ई-निविदा प्रसिध्दीचा दिनांक | ई-निविदा प्रपत्र ऑनलाईन उपलब्ध होण्याची तारीख व डी.डी.द्वारे फार्मची किंमत | इसारा रक्कम | ई-निविदा फॉर्म ऑनलाईन स्विकारण्याची अंतिम तारीख व वेळ | ई निविदा ऑनलाईन उघडण्याची तारीख व वेळ | प्रतिभूती ठेव रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | नांदेड जिल्हयातील भारतीय खादय निगमचे बेस डेपोपासून ते शासकीय धान्य गोदामापर्यंत व शासकीय धान्य गोदामापासून ते स्वस्त धान्य दुकानापर्यंतची अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तुंची वाहतुक करणे | कालावधी करारनामा केल्याचे दिनांकापासून ते 03 वर्षापर्यंत राहील. | 09 ऑक्टोंबर 2017 | 09/10/2017 ते 31.10.2017 दुपारी 2.00 वाजेपावेतो फॉर्मची किंमत रुपये 10,000/ (दहा हजार रुपये) | रुपये 1500000/- (अक्षरी- पंधरा लक्ष रुपये) | 31 ऑक्टोंबर, 2017 रोजी दुपारी 2.00 वाजेपर्यंत | 03 नोव्हेंबर 2017 | रुपये 15,00,000/- (अक्षरी- पंधरा लक्ष रुपये केवळ) |

(टिप- 1) निवीदेच्या अटी व शर्ती जिल्हा पुरवठा कार्यालयातील सुचना फलकावर कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील. निविदा फॉर्मची किंमत रुपये 10,000/- (अक्षरी-दहा हजार रुपये) असून हया रक्कमेचा डी.डी. जिल्हाधिकारी, नांदेड यांचे नावाने काढणे आवश्यक राहील व ई-निविदा सादर करण्याच्या पुर्वी स्कॅन करुन सादर करावा लागेल. प्रत्यक्ष डी.डी. दिनांक 31 ऑक्टोबर 2017 रोजी दुपारी 2.00 वाजेपर्यंत कार्यालयात स्वतंत्र लिफाफ्यामध्ये सादर केल्याशिवाय निविदा स्वीकारण्यात येणार नाही. तसेच निविदा फार्मची रक्कम रुपये 10,000/- निविदाकारास परत मिळणार नाही.

2) इसा-याची रक्कम दर्शनी हुंडीद्वारे (डिमांड ड्राफ्ट) निविदेसोबत स्कॅन करुन लिफाफा अ मध्ये टाकावी व निविदा उघडण्याच्या वेळी मूळ डी.डी. सादर करावा. दर्शनी हुंडी (डिमांड ड्राफ्ट) ही जिल्हाधिकारी नांदेड यांचे नावाने केवळ अनुसूचित अथवा राष्ट्रीयकृत बॅंकेची असणे आवश्यक आहे. ज्यांनी इसारा रक्कम भरलेली असेल त्यांना निविदा भरणे बंधनकारक आहे. निविदा न भरल्यास त्यांची इसा-याची संपूर्ण रक्कम रुपये 15,00,000/- जप्त करण्यात येईल.

3) सदरची निविदा ही www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर पाहता येईल.

4) सदर निविदेसंबंधी Pre Bid Conference दिनांक 24.10.2017 रोजी सकाळी 11.00 वाजता जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात येईल.

5) संपर्ण निविदा अथवा निविदेचा काही भाग कोणतेही कारण न देता स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी नांदेड यांनी राखुन ठेवलेला आहे.

निविदेचा तपशीलवार कार्यक्रम, सूचना आवश्यक कागदपत्रे, अटी व शर्ती, इत्यादी सर्व बाबी या वेबसाईट वर ऑनलाईन उपलब्ध असून इच्छुक निविदाकार दिनांक 09 ऑक्टोबर, 2017 पासून सकाळी 11.00 वाजेपासून ते दिनांक 31.10.2017 दुपारी 2.00 वाजेपर्यंत निविदा भरु शकतील.

जिल्हाधिकारी नांदेड

प्रतिलिपी-

1) मा.प्रधान सचिव,अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय, मुंबई 400 032 यांना माहितीस्तव सविनय सादर
2) मा.आयुक्त, (पुरवठा) औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर
3) जिल्हाधिकारी औरंगाबाद/ परभणी/ जालना /हिंगोली/ बीड /उस्मानाबाद/ लातूर/यवतमाळ/वर्धा
4) जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी एन.आय.सी.विभाग जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तुंचे वाहतुक कंत्राट सन 2017-2020 निश्चित करणेबाबत निविदा सुचना नांदेड www.mahatender.gov.in /www.nanded.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी. सोबत-जाहीरातीचा नमुना जोडण्यात आला आहे.
5) उप विभागीय अधिकारी नांदेड/भोकर/कंधार/किनवट/हदगांव/देगलूर/बिलोली/धर्माबाद जिल्हा नांदेड
6) तहसिलदार नांदेड/मुदखेड/अर्धापूर/भोकर/उमरी/कंधार/लोहा/किनवट/माहूर/हदगांव/हि.नगर/देगलूर/बिलोली धर्माबाद/ नायगांव/ मुखेड जिल्हा नांदेड यांना देवून कळविण्यात येते की, सदर निविदा बाबतची प्रसिध्दी आपले नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात यावी.

जिल्हाधिकारी नांदेड

महाराष्ट्र शासन

जिल्हाधिकारी कार्यालय, पुरवठा विभाग नांदेड

सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत धान्य उपलब्धतेच्या हमीकरीता निश्चित केलेल्या सुधारीत धान्य वितरण पध्दतीनुसार अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तुंचे वाहतुक कंत्राट 3 वर्षाकरीता निश्चित करणेबाबतची

ई- निविदा सुचना

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार जिल्हाधिकारी नांदेड यांचेकडून नांदेड जिल्हयासाठी महाराष्ट्र शासन, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षक संरक्षण विभागाचे शासन निर्णय क्र.कंत्राट-1016/प्र.क्र.169/नाप्र/16अ, दिनांक 20 एप्रील,2017 नुसार सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत धान्य उपलब्धतेच्या हमीकरीता निश्चित केलेल्या सुधारीत वितरण पध्दतीनूसार नांदेड जिल्हयामधील भारतीय अन्न महामंडळाचे बेस डेपोपासून ते शासकीय गोदामापर्यंतची अन्नधान्य, साखर (निर्धारित गोदामापासून) इ. शिधा वस्तुंची पहिल्या टप्याची वाहतुक व शासकीय गोदामापासून ते स्वस्त धान्य दुकानापर्यंत अन्नधान्य, साखर, इ. शिधावस्तु पोहोचविण्याकरीता दुस-या टप्याची वाहतुक करावयाची असून हया दृष्टीने दोन्ही टप्याकरीता 3 वर्षाच्या कालावधीसाठी निश्चित करण्यासाठी एकत्रित निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे. सदर निविदा प्रक्रियेची कार्यवाही ऑनलाईन ई-निविदा पध्दतीने करण्यात येत असून हया संबंधी निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे नमुद करण्यात आलेल्या आहेत.

निविदेच्या अटी व शर्ती

1. निविदेसंबंधी थोडक्यात माहिती-

अ. कामाचे वर्णन- भारतीय अन्न महामंडळाचे बेस डेपो (M.S.W.C. ढवळे कॉर्नर सिडको नांदेड) व C.W.C. तुप्पा,नांदेड) पासून ते शासकीय गोदामापर्यंतची अन्नधान्य, साखर (निर्धारित गोदामापासून) इ.शिधावस्तुंची पहिल्या टप्याची वाहतुक व शासकीय गोदामापासून ते शिधावाटप दुकानापर्यंत अन्नधान्य, साखर इ. शिधावस्तु पाहोचविण्याकरीता दुस-या टप्याची वाहतुक करणे.

( टिप- नांदेड येथे दोन बेस डेपा असून त्यापैकी C.W.C. तुप्पा नांदेड, व M.S.W.C. सिडको नांदेड )

ब. वाहतुक कामाचा कालावधी- करारनामा झाल्यापासून तीन वर्षापर्यंत

क. ई-निविदा प्रपत्र ऑनलाईन उपलब्ध होण्याची तारीख 09.10.2017 ते 31.10.2017 दु.2.00 पर्यंत

ड. ई- निविदा फॉर्म ऑनलाईन स्विकारण्याची अंतिम तारीख 31.10.2017 दुपारी 2.00 पर्यंत

ई. ई-निविदा ऑनलाईन उघडण्याची तारीख 03.11.2017 दुपारी 1.00 वा.

फ. प्रतिभुती ठेव रुपये 15,00,000/- (अक्षरी- पंधरा लक्ष रुपये केवळ)

ग. निविदेबाबतची माहिती - निविदेचा तपशीलवार कार्यक्रम, सुचना, आवश्यक कागदपत्रे, अटी व शर्ती इत्यादी सर्व बाबी www.mahatender.gov.in व www.nanded.nic.in या संकेतस्थळावर ऑनलाईन तसेच कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयातील सूचना फलकावर पाहता येईल.

घ. निविदा फॉर्मची किंमत - निविदा फॉर्मची किंमत रुपये 10,000/- (अक्षरी- दहा हजार रुपये केवळ) असून निविदा फॉर्मची रक्कम रुपये 10,000/- (दहा हजार रुपये) परत मिळणार नाही.

च. ईसारा रक्कम- ईसारा रक्कम रुपये 15,00,000/-( अक्षरी- पंधरा लक्ष रुपये केवळ) ज्यांनी ईसारा रक्कम भरली आहे त्यांनी निविदा भरणे बंधनकारक आहे. निविदा न भरल्यास त्यांची संपुर्ण इसारा रक्कम जप्त करण्यात येईल.

छ. प्री.बिड (Pre bid) मिटींग दिनांक 24.10.2017 रोजी सकाळी 11.00 वाजता जिल्हाधिकारी नांदेड यांचे अध्यक्षेतेखाली घेण्यात येईल.

ज. संकेतस्थळाबाबत माहिती- सदर निविदा www.mahatender.com व www.nanded.nic.in या वेबसाईटवर पाहता येईल.

झ. वाहतुकी संदर्भात शासन निर्णयाची प्रत- शासन निर्णय अन्न नागरी पुरवठा विभाग क्र.कंत्राट-1016/प्र.क्र.169/ना.प.16 अ, दिनांक 20 एप्रील,2017 ची प्रत निविदेसोबत उपलब्ध राहील. तथा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक 201704201346483806 असा आहे.

## 2. सुधारीत वाहतुक पध्दत-

| | |
|---|---|
| 1.1 | पहिल्या टप्याची वाहतुक- नांदेड जिल्हयामधील भारतीय अन्न महामंडळाच्या बेस डेपोपासून M.S.W.C. ढवळे कॉर्नर सिडको नांदेड व C.W.C. तुप्पा,नांदेड) ते शासकीय धान्य गोदामापर्यंतची अन्नधान्य, साखर (निर्धारित गोदामापासून) ई. शिधावस्तुंची पहिल्या टप्याची वाहतुक करण्यात येईल.<br>" पहिल्या टप्याअंतर्गत जिल्हा मुख्यालयाच्या शहरामध्ये जेथे भारतीय खादय निगमचा बेस डेपो व शासकीय धान्य गोदाम एकाच शहरात आहेत अशा ठिकाणी, भारतीय अन्न महामंडळाच्या बेस डेपोपासून (साखरेसंदर्भात निंधारित गोदामापासून) शिधावाटप दुकानापर्यत अशी थेट वाहतुक करण्यात येईल त्यासाठी थेट वाहतुकीची कार्यपध्दती लागु राहील." असे शासन निर्णयामध्ये निर्देश दिलेले आहे. त्यामुळे नांदेड शहरातील सी.डब्लु.सी. चे बेस डेपोपासून उचल सुरु झाल्यास व सी.डब्लु.सी. नांदेड या बेस डेपोमधून वाहतुक करण्याची झाल्यास अशा वेळी थेट वाहतुकीची कार्यपध्दती लागु राहील. त्यामुळे सी.डब्लु.सी. नांदेड येथील बेस डेपोपासून (साखरे संदर्भात निर्धारित गोदामापासून) ते शिधावाटप दुकानापर्यंत अशी थेट वाहतुक करण्यात येईल व त्याकरीता पाहिल्या टप्याच्या वाहतुकीचे प्रति क्विंटल दर हे जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी प्रस्तावित थेट वाहतुकीसाठी लागु राहील. |
| 1.2 | दुस-या टप्याची वाहतुक- शासकीय धान्य गोदामापासून रास्तभाव दुकानापर्यंत अन्नधान्य, साखर इत्यादी जीवनावश्यक वस्तु पाहोचविण्याकरीता दुस-या टप्याची वाहतुक करण्यात येईल.<br>परिमंडळातील मनपा क्षेत्रातील जिल्हयाच्या मुख्यालयाच्या शहरातील शिधावाटप कार्यालय त्यांच्या क्षेत्रात असलेले शिधावाटप दुकाने व त्यांचे कमी अधिक असलेले नियतन त्याचप्रमाणे भौगोलीक परिस्थिती व वाहतुकीचे उपलब्ध मार्ग यांच्या आधारे वाहतुकीचे मार्ग व शिधावाटप कार्यालय निहाय वाहनांची संख्या निश्चित करण्यात यावी व आवश्यक वाहनांची संख्या निविदा पुर्व बैठकीच्या वेळी निविदाकारास कळवावी. त्यानुसार निविदा मंजूर झाल्यास किमान स्वमालकीच्या व नियंत्रणाखालील वाहनाव्यतिरीक्त किती नियंत्रणाखालील अधिक वाहने उपलब्ध करुन दयावी लागतील हे स्पष्ट करावे. |
| 1.3 | शासनाच्या वतीने लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत विविध योजनेतील अन्नधान्य (साखरेसह) व इतर शिधावस्तुंच्या वाहतुक कंत्राट निश्चितीकरीता खुल्या ई-निविदा मागविणे, निविदा प्रक्रिया पूर्ण करणे व दर मंजूर झालेल्या निविदाकाराशी विहीत कालावधीत करारनामा करण्याची जबाबदारी या जिल्हयाकरीता जिल्हाधिकारी नांदेड यांची आहे. |
| 1.4 | निविदेचा तांत्रिक लिफाफा उघडणे, निविदाकारास तांत्रिकदृष्टया पात्र ठरविणे, दराचा लिफाफा उघडणे व प्रदान केलेल्या अधिकार मर्यादेमध्ये निविदा दर मंजूर करणे ईत्यादी अधिकार जिल्हास्तरीय निविदा समितीस असतील. |
| 2 | वाहतुकीकरीता आधारभूत दर |
| | वाहतुकीच्या पध्दतीनूसार निविदा प्रक्रियेसाठी निर्धारित केलेले आधारभूत दर पुढीलप्रमाणे असतील. |

| वाहतुकीची पध्दत | आधारभूत दर |
|---|---|
| पहिल्या टप्याची वाहतुक | 48.00 रुपये प्रति क्विंटल संपूर्ण अंतराकरीता |
| दुस-या टप्याची वाहतुक | 40.00 रुपये प्रति क्विंटल संपूर्ण अंतराकरीता |

पहिल्या टप्याच्या वाहतुकीचे प्रति क्विंटल दर हे जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी प्रस्तावित थेट वाहतुकीसाठी लागु राहतील.

अपरिहार्य कारणास्तव नियमित बेस डेपोपासून नियतन उपलब्ध करुन देण्यास भारतीय अन्न महामंडळाने असमर्थता दर्शविल्यास पर्यायी डेपोतून किंवा अन्य जिल्हयातील बेस डेपोतून वाहतुक करावी लागल्यास अशा वाहतुकीसाठी जिल्हयातील बेस डेपोच्या अंतराच्या प्रमाणात जितकी टक्के वाढ होईल तितके टक्के वाढ क्विंटल दरामध्ये देण्यात येईल.

तथापी एखादया जिल्हयात एफ.सी.आय. चा कोणताही डेपो नसेल व जिल्हयास नेमुन दिलेले नियमित व पर्यायी बेसडेपो हे दोन्ही बेसडेपो अन्य जिल्हयात असतील तर अशा परिस्थितीत त्या जिल्हयासाठी, ठरवून दिलेल्या अन्य जिल्हयातील नियमित बेसडेपोतून अन्नधान्य वाहतुक करण्यासाठी जे दर निविदेअंती निश्चित होतील त्या पहिल्या टप्याच्या दरांच्या आधारे अन्य जिल्हयातील पर्यायी बेसडेपोच्या अंतराच्या प्रमाणात जितकी टक्के वाढ होईल तितकी टक्के वाढ क्विंटल दरांमध्ये देण्यात यावी. मात्र पर्यायी डेपोमधून धान्य उपलब्ध होण्याची वारंवारता वाढत असेल तर पर्यायी डेपोला नियमित बेसडेपो बदलून घेण्याची कार्यवाही तातडीने करण्याची जबाबदारी कार्यालयाची राहील.

**3 निविदेसंबंधी पात्रतेचे निकष व अटी-शर्ती**

**3.1 आर्थीक अनुभव / कुवत -**

निविदाकारास मागील एक वर्षाचा वाहतुकीचा अनुभव असावा. **वाहतुकदार संस्था Shop Act नुसार नोंदणी झाल्यानंतर चालु वर्षापर्यंतच्या मधील कोणत्याही कालावधीचा किमान 1 वर्षाचा अनुभव पात्रतेसाठी गृहीत धरण्यात यावा.** निविदाकाराचा सरकारी / निमसरकारी वाहतुकीचा अनुभव निश्चित विचारात घेण्यात येईल मात्र ती तांत्रिक पात्रतेची अट असणार नाही.

लक्ष्यनिर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत वाहतुक करण्याची निविदाकाराची आर्थीक कुवत असणे आवश्यक आहे. त्यासाठी निविदाकाराचा मागील एक वर्षाचा केवळ वाहतुकीचा एकूण किमान आर्थीक व्यवहार ( Turn over) वाहतुकीच्या पध्दतीनूसार खालीलप्रमाणे असावा.

| वाहतुकीची पध्दत | आर्थीक व्यवहार |
|---|---|
| पहिल्या व दुस-या टप्याची वाहतुक | 1.50 कोटी रुपये |

3.2 इसारा रक्कम

3.2.1 निविदेसोबत पुढीलप्रमाणे इसारा रक्कम भरावी.

| वाहतुकीची पध्दत | इसारा रक्कम |
|---|---|
| पहिल्या व दुस-या टप्याची वाहतुक | 15.00 लक्ष रुपये |

3.2.2 **सदर इसा-याची रक्कम ऑनलाईन पध्दतीने भरण्यात यावी.**

3.2.3 ज्यांनी इसारा रक्कम भरलेली असेल, त्यांना निविदा भरणे बंधनकारक आहे. निविदा न भरल्यास त्यांची इसा-याची संपूर्ण रक्कम जप्त करण्यात येईल.